
REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 4 | JANUARY - 2018
UGC APPROVED JOURNAL NO. 48514

# यशवंतराव चव्हाण यांची ग्रामविकासाची संकल्पना

**प्रा.डॉ.शिवाजीराव देशमुख**
मराठी विभाग, तुळजाभवानी महाविद्यालय, तुळजापूर.

## प्रस्तावना :



महाराष्ट्राचे शिल्पकार पहिले मुख्यमंत्री कै.यशवंतराव चव्हाण यांचे **१२ मार्च २०१२ हे जन्मशातब्दी वर्ष** साजरे करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने नुकताच घेतला आहे. या निमित्त त्यांच्या ग्रामविकासाच्या संकल्पनेबाबत त्यांची भूमिका काय होती हे सांगण्याचा हेतू आहे. यशवंतराव हे गोर-गरीबांबद्दल कणव वाटणारे, हरिजन-गिरीजनाबद्दल आत्मियता असणारे अष्टावधानी राज्यकर्ते होते.यशवंतराव शेतकरी-कष्टकरी, कामगार यांचेबद्दल आस्था बाळगणारे नेते होते.कलावंत, लेखक, साहित्यिक, क्रीडापटू यांचेबद्दल आदर, आपुलकी दाखविणारे रसिक मनाचे, दष्टे होते खंबीर, धैर्यवान, कर्तृत्वान, बुध्दीमान नेता म्हणून महाराष्ट्र आजही आदराने नांव घेतो. **"माणूस म्हणून"** यशवंतराव फार मोठे होते. अशा या व्यक्तिमत्वाचा महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक जीवनावर वैशिष्टयपूर्ण ठसा उमटलेला आहे त्यांच्या या विचारामुळे महाराष्ट्र, काल, आज आणि उदयाच्या संदर्भात जाणून घेता येऊ शकतो. या क्षेत्रात महाराष्ट्राची प्रगती कशी होत गेली. याचे सिंहावलोकनही करणे आवश्यक आहे. **"आजचे नेते,उदयाचे प्रेरक"** या नात्याने तरुण पिढीला, त्यांचे विचार समजावेतम्हणून हा छोटासा प्रयत्न आहे. यशवंतराव लोकनेते होते. खरा लोकनेता हा एका अर्थाने लोकशिक्षक असतो. लोकनेत्याला लोकांच्या विविध प्रश्नांची जाणीव असणे आवश्यक असते. त्याचबरोबर लोकनेत्यांनी समाजाचे सातत्याने प्रबोधन करावे लागते. तेच नेमके यशवंतरावांनी केले, आणि नवमहाराष्ट्रात विचारांची एक विण तयार झाली. ग्रामीण महाराष्ट्राचा आकृतीबंध कसा असावा याविषयी त्यांनी सतत चिंतन आणि कार्य केले. म्हणून महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांचे फार महत्वाचे कार्य आहे. त्यांनी अनेक उच्चपदे भूषविली या त्यांच्या राजकीय राजवटीमध्ये त्यांचा प्रभाव इतका मोठा होता की, स्वातंत्र्योत्तर काळात तेवढा प्रभाव कोणत्याही नेत्याला महाराष्ट्रात पाडता आला नाही. या पदावरुन त्यांनी जे समाजप्रबोधन केले ते महत्वाचे आहे. राष्ट्रीय ऐक्यभाव, एकात्मतेची गरज, साहित्य-शिक्षण व संस्कृती, कृषीक्षेत्र, औद्योगिक क्षेत्र व समाज रचना, नियोजन मनुष्यबळ, ग्रामीण विकासाचे नियोजन आणि प्रशासन इत्यादी आणि अशा संबंधिची त्यांची विचारसरणी मार्गदर्शक स्वरुपाची आहे. ते नाना क्षेत्रामध्ये वावरले. त्यांच्या फक्त वावरण्याने त्या त्या क्षेत्रामध्ये चैतन्य खेळत राहिले. त्यांच्यामुळे अनेक ग्रामीण विधायक उपक्रमांना चालना मिळाली. कल्पकतेला आणि धडपडीला दिशा मिळाली. समाजात व राजकारणात डोळे व कान उघडे ठेवून सावधपणे जे जे पाहिले, अनुभवले व ऐकले ते त्यांनी आपल्या भाषणाचा विषय ठरवून विस्ताराने परंतू आकर्षकपणे व भाषा प्रभूत्वाने सादर केले.**'कृष्णाकाठ', 'सहयाद्रीचे वारे', 'ऋणानुबंध', 'भूमिका', 'शिवनेरीचे नौबती', 'युगांतर', 'यशवंतराव चव्हाण शब्दांचे सामर्थ्य' या सारख्या साहित्यीककलाकृती यामुळे निर्माण**

**झाल्या. अलौकिक शैलीदार लिखाणामुळे त्यांनी वाचकावर मोहिनी टाकली होती. अशी माणसे होती, म्हणून जेष्ठांना आपल्या जगण्याचे सार्थक कळते आणि तरुणांना नवी क्षितिजे धुडांळण्याचे बळ मिळते, ती असतात म्हणून वर्तमानाला भूतकाळाचा सुंदर आशीर्वाद मिळतो.**

ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासाचा आणि कल्याणाच्या चळवळीचा त्यांनी त्यांच्या भाषणातून हिरीरीने पुरस्कार केला. राजकारण हे लोककल्याणासाठी असते हे त्यांनी पुढाऱ्यांना व जनतेस निक्षून सांगितले. त्यांनी आपली बुध्दीमत्ता, मुत्सद्देगिरी आणि कर्तृत्व यांचा योग्य वापर करुन आपल्या वाणीच्या जोरावर ग्रामीण महाराष्ट्राचे हित साधण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्राच्या सर्वांगीण उत्कर्षासाठी अनेक योजना राबविल्या. **सत्तेचे विक्रेद्रींकरण** करुन लोकशाहीची मुळे गाव पातळीवर रुजविली.**'पंचायत राज'** व्यवस्था त्यांच्याच कारकिर्दीत महाराष्ट्रात सुरु झाली. ग्रामीण भागाच्या विकासासाठी त्यांनी **सहकार चळवळीला प्रोत्साहन** दिले. त्यांच्या काळात राज्यात **अठरा सहकारी साखर कारखाने** सुरु झाले. **'कसेल त्याची जमीन'** असा कायदा करुन त्यांनी कष्टकऱ्यांना दिलासा दिला. महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी ठरलेली **'कोयना जलविद्युत प्रकल्प'** त्यांच्याच दूरदर्शी नेतृत्वाचे देण आहे. महाराष्ट्रात **'ग्रंथालय संघ'** त्यांच्याच पुढाकाराने १९६२ साली स्थापन झाला. 'चौदा वर्षाखालील मुला मुलींना शिक्षणासाठी **मोफत शिक्षणाची** सवलत दिली. गोर गरीब मुलांना **शिष्यवृत्या** दिल्या, **ई.बी.सी.ची** सवलत जाहीर केली., **मराठवाडा विद्यापीठाची** स्थापना, **शिवाजी विद्यापीठाची** स्थापना यामध्ये पुढाकार घेतला. किंबहुना त्यांच्याच प्रेरणेने या विद्यापीठाची स्थापना झाली. आज वटवृक्षात रुपांतरीत झालेल्या उद्योगक्षेत्राचे रोपटे त्यांनीच सिंचित केले आहे. **'साहित्यसंस्कृती मंडळ'** याची निर्मिती करुन महाराष्ट्राच्या सांस्कृतिक संचितात भर घालण्याचे काम त्यांनी केले. अवघ्या दोन वर्षाच्या मुख्यमंत्री पदाच्या कारकिर्दीत त्यांनी घातलेल्या पायावरच आज राज्याच्या विकासाची इमारत उभी आहे. या त्यांच्या दूरदृष्टीच्या अनेक क्रांतीकारक निर्णयामुळे खेडया-पाडयातील पारंपारिक जीवन धारणेत, मूलभूत स्वरुपाचे परिवर्तन झाले. **अक्षरांच्या सहवासात विचारांच्या परिवर्तनास गती लाभली**, जीवन धारणेत कमालीचे स्थित्यांतर घडून आले.

यशवंतराव चव्हाण यांनी ग्रामीण महाराष्ट्राच्या प्रश्नाबाबत परखड विचार मांडले एकूणच देशाच्या व महाराष्ट्राच्या पुरोगामी धोरणांना दिशा देण्यासाठी तसेच राज्यकारभाराच्या वाढत्या भ्रष्टाचाराचे निर्मूलन करण्यासाठी केंद्रीय मंत्री या नात्याने आपले सर्व वजन आणि सामर्थ्य पणाला लावले देशातील ग्रामीण भागामधील जनतेला **न्यायाची, समानतेची नि** विकासाची शाश्वती वाटण्यासाठी अनेक व्यासपीठावरुन **त्यासंबंधी मुलगामी विचार मांडले. महाराष्ट्राच्या विविधतेत** समृध्दतेने कशी भर घातली आहे हे मुंबई आकाशवाणीवरील त्यांच्या भाषणावरुन स्पष्ट होते. "उत्तरेस सातपुडा आणि पश्चिमेस सहयाद्रीची उंत्तुग शिखरे व यांच्या उतरणीवरील घनदाट जंगले यांनी या भागास भव्योदत्ता सौंदर्य प्राप्त झाले आहे, तर वर्धा वैनगंगेच्या खोऱ्यात जागोजाग असलेली जलाशय व पळसाच्या लाल फुलांनी डवरलेली राने मनाला प्रसन्नता आणतात, कोकणचा किनारा अथांग पश्चिमसागराचे दर्शन घडवितो, तर गोदेच्या पाण्याने पुनीत व समृध्द झालेल्या मराठवाडयाची भूमी महाराष्ट्राच्या तेजस्वी भूतकाळाची आठवण करुन देते. नागपूरच्या परिसरात भारतातच केवळ नव्हेतर आशियात उत्तम म्हणून नावाजलेली संत्री पिकतात. तर रत्नागिरीकडे भारतात ज्याच्या तोडीस दुसरा आंबा नाही तो हापूस आंबा अमर्याद पिकतो. विदर्भ-मराठवाडयाच्या काळयाभोर जमीनीत कापूस भरघोस पिकतो तर नगर-सोलापूर, कोल्हापूर भागात पिकणारा रसदार ऊस तोंड गोड करतो. निरनिराळया भागातील लोकांच्या बाबतीतही विविधता आहे. कोकणपट्टीतील माणसाचे अनुनासिक उच्चार ऐकूण देशावरचा माणसाला मौज वाटते तर खानदेश वऱ्हाडचा माणूस एक विशिष्ट हेल काढून बोलू लागला की, सांगली कोल्हापूरकडील माणसांच्या चेहऱ्यावर स्मिताची रेषा न झळकली तरच आश्चर्य! पण या विविधतेतच महाराष्ट्रातील जीवनाचे सौंदर्य साठलेले आहे. अशी विविधता नसेल तर जीवन निरस व रंगहिन होईल." ग्रामीण महाराष्ट्राच्या संस्कृतीतील एकजिनसीपणा, भाषिक ऐक्य, भौगोलिक एकात्मता व माणसामाणसांच्या **मनाचा सांधा जोडण्यावर** अधिक भर दिला आहे. राज्यातील **एकता आपण अधिक** मजबूत केली पाहिजे. **सामाजिक व आर्थिक विकास** करताना **मतभेद निर्माण** न होता. **ऐक्यास तडा जाणार** नाही याची काळजी घेतली पाहिजे. **विरोध विधायक असावा**. तो **आंधळा किंवा विरोधासाठी विरोध नसावा. वादामधून** तत्वबोध व्हावा. अन्यथा त्या वादाला कांहीच अर्थ

राहणार नाही. म्हणून ममत्वाच्या भावेनेने हे अंतर कमी करता येईल व ग्रामीण महाराष्ट्राच्या ऐक्याला तडा जाणार नाही. तेंव्हा ते सर्वांच्या सहकार्याची अपेक्षा बाळगत असत.

महाराष्ट्र राज्य हा जगन्नाथाचा रथ आहे. या **रथास भक्तांचा हात लागल्याशिवाय** तो हालणार नाही. म्हणजेच महाराष्ट्राचा गाडा जनतेच्या मदतीशिवाय चालणार नाही. महाराष्ट्राच्या सर्वांगीण उन्नतीचे कार्य, दिशा स्पष्ट करताना ते सांगतात, "महाराष्ट्राच्या भवितव्याची ही मोठीच मोठी, लांबच लांब सफर आहे... त्या सफरीतील आम्ही प्रवाशी आहोत... ही सफर तुम्हा आम्हाला पुरी करावयाची आहे... कारण त्यात जनतेचे कल्याण आहे..." यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या भवितव्याची आणि जनसामान्याची प्रगतीविषयी भूमिकाच व्यक्त केली आहे. त्यांचे हे स्वप्न केवळ राजकीय सत्ता मिळविण्याचे नव्हते, तर ग्रामीण विकासासाठी समाजपरिवर्तन घडवून आणावयाचे होते. आणि खरे लोकराज्य निर्माण करावयाचे होते.

यशवंतरावांनी महाराष्ट्राच्या **जनकल्याणांची चिंता सदैव** मनात बाळगून कार्य केले आहे. महाराष्ट्रातील **जनतेनेही दुःखविरहीत जीवन जगण्यासाठी काळजी** घ्यायला सांगताना ते म्हणतात," दुखाःत असलेल्या जनतेच्या जीवनावर सुखाची सावली निर्माण करने हे राजाचे कार्य आता प्रत्येक मराठी माणसांने केले पाहिजे. एकेक माणूस एकेक मूल हे सावली देणारे झाड आहे. असे मानुन त्यास खतपाणी घातले पाहिजे." यावरुन यशवंतरावांच्या मनात गोर-गरीब जनतेबाबत किती कणव होती हे स्पष्ट होतेच, शिवाय बंधूभाव वाढीस लागून महाराष्ट्रातील जनतेचे जीवन सुंदर बनविण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावा ही त्यांची भावनाही स्पष्ट होते. महाराष्ट्रीय लोकांनी आपला धर्म,जात, अगर पक्ष विसरुन आपण सर्व एक बांधव आहोत असे मानले पाहिजे. **"आजच्या दुनियेमध्ये आपण सगळया गोष्टींशी तडजोड केली तर चालेल, पण माझे स्वतःचे असे मत आहे की, एका गोष्टींशी आपण बिलकुल तडजोड करता कामा नये आणि ती म्हणजे गरीबी"**. उदयाच्या ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासाची जडणघडण करताना स्व. यशवंतराव चव्हाणांचे विचार व कार्य हे दीपस्तंभासारखी प्रेरणादायी ठरणारे आहे.

यशवंतरावांची ग्रामीण विकासांच्या संदर्भातील मते अतिशय निर्भिड असत. ते एके ठिकाणी असे विचार मांडतात, "विकास करावयाचा असेल तेथील आर्थिक जीवन संपन्न करावयाचे असेल, तर **ज्याप्रमाणे कांही जिवंत पाण्याचे झरे असल्याशिवाय**, नदी **वाहू शकत** नाही त्याप्रमाणे येथे **जिव्हाळयाच्या ज्या कांही शक्ती** असतील त्या **मोकळया केल्या पाहिजेत"** अशा स्वरुपाचा कळवळा ग्रामविकासाच्या बाबतीत होता. जेंव्हा विकासाच्या या मोठया संकल्पनेतून तुम्हाला आम्हाला आपल्या देशाला पुढे घेवून जावयाचे आहे. तेंव्हा कांही कठिण शिस्तीचे प्रयोग आपल्याला या देशामध्ये स्वीकारावे लागतील. " आजही साडेतीन कोटी एकर जमीन महाराष्ट्रात असे आहे की, जी गळक्या भांडयासारखी आहे. मथुरेची गवळण पाणी भरुन डोक्यावर हंडा घेवून निघाली आणि घरी येवून पाहती तो आपल्या डोक्यावरच्या हंडयामध्ये पाणी नाही. तसेच आपल्या शेतीचे झाले आहे" महाराष्ट्रातील माणूस आणि त्याचा विकास साधावयाचा हे उद्दीष्ट डोळयासमोर असल्याने येथील जनतेला विकासासाठी वापरता येऊ शकेल असे उपलब्ध साधन म्हणजे शेती आणि सहकार ही होत. हीच देशाच्या विकासाचा मोठा आधार असतो. त्यासाठी तेवढयाच सक्षम नियोजनाची आवश्यकता असते. राज्याच्या विकासात सहकार, आरोग्य, औद्योगिकीकरण, नागरीकरण, मनुष्यबळ, शेती, या व्यवसायाने मोठी भर घातली पाहिजे असे त्यांना वाटते.

यशवंतरावांनी **'माझ्या कल्पनेतील खेडे'** या विषयावर पुणे आकाशवाणीवरुन भाषण केले त्यावेळी त्यांच्यातील विकसीत खेडयाची कल्पना ते पुढीलप्रमाणे स्पष्ट करतात." माझ्या कल्पनेतील खेडे म्हणजे केव्हा एके काळी लोक शेती करु लागले. आणि तिच्या भोवती राहू लागली आणि म्हणून बनले ते खेडे नाही किंवा ओढयाच्या काठी शीळ घालीत हिंडणारा आणि कोकिळेची साद ऐकत फिरणारा कवी कल्पना करतो ते खेडे नाही, तर देशाच्या जीवनात आपले स्थान घेणारे सदैव विकास करणारे, या टोकापासून त्या टोकापर्यंत जीवनाचे पडसाद ज्याच्यावर पडत आहेत म्हणजे आपल्या उत्पादन क्षमतेने इतरांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेत आहे असे वर्धिष्णू गाव हे माझ्या कल्पनेतील खेडे आहे." ग्रामीण भागात विकासांच्या **माध्यमातून नवचैतन्य निर्माण** झाले पाहिजे अशी त्यांची अपेक्षा होती. तसेच ग्रामीणभागातून नवचैतन्य निर्माण करुन लोकशाहीस पूरक असे नवे नेतृत्व निर्माण झाले पाहिजे. सहकाराच्या माध्यमातून नव्या सुधारणा देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहचल्या पाहिजेत असे ते सांगत. आपली भरभराट शेतीवर अवलंबून आहेच एवढेच नव्हेतर आपले औद्योगिकीकरण

शेतीच्या भरभराटीवर अवलंबून आहे असे त्यांचे ठाम मत होते. एवढेच नव्हेतर शेतीला उद्योगाची जोड देवून कृषी उद्योग निर्माण करण्यावर त्यांनी भर दिला. महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, ग्रामीण व कृषी औद्योगिक, सहकार परिवर्तनाचा नवा दृष्टीकोन जनतेसमोर ठेवला. ग्रामीण भागाचा कायापालट करण्यासाठी कष्टकरी आणि कामकरी माणसाला माणूस म्हणून विकासाच्या नव्या वाटांवर स्वबळावर त्यांनी उभे करण्याचा प्रयत्न केला. **श्रमाइतके व घामाइतके सुंदर जगात कांहीच नाही अशी त्यांची ठाम भूमिका होती.** म्हणूनच त्यांनी श्रमिकाविषयी व ग्रामीण लोकांविषयी फार जिव्हाळा होता. जवळीक वाटत होती. उद्योगधंदे, कारखानदारी, रोजगारी, बेकारी याविषयी त्यांनी मांडलेले वेगवेगळे विचार फार महत्वाचे आहे. **शेतकरी, कामगार, कारागिर यांची शक्ती आणि बुध्दी सहकाराकडे** वळवायला हवी. तिला विधायक वळण दयायला हवे असे वातावरण ग्रामीण भागात निर्माण झाले पाहिजे, आपल्या स्वप्नांचे उद्दीष्टये सांगताना ते म्हणतात, "एकमेकांच्या वैराने वसवलेले, दारिद्रयाने निराश झालेले, आजपर्यंत एकसारखा कुणीतरी आपल्यावरती अन्याय केला या भावनेने इतरांकडे संशयांने पाहणारे असे गाव वसवण्यापेक्षा एकमेकांकडे सह्दयतेने मदत करण्याच्या भावनेने पाहणारे बंधू बंधूचा असा एक निराळा समाज खेडयातून आपल्याला उभा करावयचा आहे." असे ग्रामीण भागाबाबत व्यापक उद्दीष्टये ते स्पष्ट करतात. ग्रामीण भागातील शेतकऱ्याला **सहकारातून कर्ज पुरवठा** करता आला, त्याच्या शेतीमालावर **प्रक्रिया करणारे कारखाने** सुरु करता आले तरच त्याची आर्थिक दुरावस्था दूर करता येईल. **सहकारात उध्दाराची शक्ती आहे**. म्हणूनच महाराष्ट्राच्या औद्योगिक दृष्टया अविकसित ग्रामीण भागापर्यंत ही सहकाराची चळवळ पोहचविण्याचे काम यशवंतरावांनी केले. ही **चळवळ जनतेची चळवळ** व्हावी अशी त्यांची रास्त अपेक्षा होती.

**दुर्बलांना सामर्थ्य देण्यासाठी सहकारी** चळवळींचा जन्म झालेला आहे. या मूळ प्रेरणेकडे दुर्लक्ष होणार नाही याची काळजी घेण्याची गरज आहे. असा सल्लाही त्यांनी दिला आहे. विकासाची ही प्रक्रिया **तळाच्या माणसापर्यंत पोहचवायची** असेल तर विकासाची संघटना व सत्ता जनतेच्या शेवटच्या थरापर्यंत पोहचली पाहिजे असे आग्रही विचार त्यांनी मांडले. महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती करावयाची असेल तर **शिक्षणाचा प्रसार होवून जनता शहाणी** व समजुतदार झाल्याशिवाय सहकारी चळवळीचा पाया भक्कम होणार नाही. शेती हाच महाराष्ट्रातील लोकांचा मुख्य व्यवसाय आहे. तो ग्रामीण विकासाचा गाभा आहे. या गाभ्याभोवती **छोटया उद्योगाची इमारत उभारली** पाहिजे. महाराष्ट्राच्या भूमीवर **उद्योगाचे भव्य मंदिर उभारण्यासाठी** शासनाचे मार्गदर्शन आणि उत्तेजन असायला हवे. सामान्य माणसाचे अर्थशास्त्र सहकाराशिवाय सुटणार नाही. सामान्य माणसाचे हित जोपासण्याच्या अर्थनीतीस त्यांनी त्यांच्या भाषणातून प्राधान्य दिले. याचबरोबर लोकशाहीचे हे स्वरुप कोठेही डागाळणार नाही याची काळजी सर्वांनी घेतली पाहिजे. कारण सहकार चळवळीत 'आर्थिक सत्ता" आहे याची जाणीव लोकांना झाली आहे. त्यामुळे ही चळवळ एका अर्थाने सत्तेचे केंद्र बनत आहे. आणि सत्तेचे केंद्र म्हटले म्हणजे लोकशाहीचा अंकुश त्यावर ठेवलाच पाहिजे. तसे न केल्यास अनियंत्रित सत्तेमुळे विकासाचे हे शस्त्र दुधारी ठरेल. अशी साधार भीती ते व्यक्त करतात. यासाठी **विधायक विचाराचे बी रक्तात भिजत घातले पाहिजे**, ते **रुजले पाहिजे**, तरच **त्याला कोंब फुटतील आणि कालांतराने फळे येतील** असा विश्वास ते व्यक्त करतात. राष्ट्राची खरीखुरी शक्ती केवळ सशस्त्र दलांच्या शक्तीवर आणि संख्यावर अवलंबून नसते, तर ती त्या राष्ट्राच्या मजबूत अर्थ व्यवस्थेमध्ये सामावलेली असते. आणि म्हणून विकास हा आपल्या सरंक्षणाचा कणा आहे. यासाठी भांडवल- गुंतवणूकीची गरज असते. त्यामध्ये देशी तसेच परदेशी चलनाचा समावेश असावा. एकूणच समाजाचे सर्व घटकांचे जीवनमान एका विशिष्ट दर्जाचे व्हावे अशी त्यांची इच्छा होती.

आज खेडया-पाडयात सहकार पोहचला सहकारी साखर कारखाने उभारले गेले सहकारी सुतगिरणी, सहकारी बँका, सहकारी सोसायटया, सहकारी खत उद्योग, सहकारी पतसंस्था यांचे जाळे खेडोपाडी उभारले गेले. सावकाराच्या दारात हरघडी जावे लागणाऱ्या शेतकऱ्यास सुलभ पतपुरवठा उपलब्ध झाला. दळणवळणासाठी रस्ते विकास प्रकल्प राबविले जातात, वीज खेडयात पोहचली याचे श्रेय यशवंतरावांच्या दृष्टेपण नेतृत्वाला दयावे लागेल. त्याच्यासाठी कर्ज पुरवठा करणे, उत्पादित शेतमालाची विक्री करणे, शेती विकास, शेत मालावर प्रक्रिया, घर बांधणी, दुग्धोउत्पादन, कुकूटपालन इत्यादी सहकारी संस्थांना चालना मिळाली. या संस्थांना कर्ज पुरवठयाची **सोय सहकारी बँका, भूविकास बँका यांचेमार्फत करण्यात** येवू लागली. गेल्या कांही वर्षात या राज्यात केलेले आर्थिक, सामाजिक, कृषी औद्योगिक प्रगती हे त्यांनी उराशी

बाळगलेले स्वप्न होते. गरीब, कष्टकरी, **अशिक्षित मराठी माणूस महाराष्ट्रात ताठपणाने-ताठमानाने समर्थपणे उभा राहून** ग्राम विकास साधावा या हेतूने त्यांनी केलेले समर्थ मार्गदर्शन आज ग्रामीण मराठी मनाचा- महाराष्ट्राचा स्थायीभाव झाला आहे. तेंव्हा तुम्हा **आम्हाला तुमच्या आमच्या मनामध्ये विकासासाठी निर्धाराचे दुर्ग** उभे केले पाहिजेत. सारख्या **उसनवारीने संसार चालला तर तो फार दिवस टिकत नाही** अशी धोक्याची सूचनाही ते देतात.

यशवंतरावाचे असे विचार आशय अविष्कार व अभिव्यक्तीच्या दृष्टीने महत्वाचे असल्याने ते चिंतनांचे विषय बनतात. अशा विचारातून त्यांनी उद्‌बोधन आणि प्रबोधनाची भूमिका स्वीकारल्याचे दिसते. महाराष्ट्राच्या सर्वांगीण उत्कर्षासासाठी अनेक योजना राबविल्या पाहिजे. त्या जनतेपर्यंत गेल्या पाहिजे. या दृष्टीने त्यांनी अनेक ठिकाणी मुक्त चिंतन केले आहे. जनतेला न्यायाची, समानतेची नि विकासाची शाश्वती देण्यासाठी ग्रामविकासांवर अधिक भर दिला. ग्रामविकासांची संकल्पना सर्वांपर्यंत पोहचविण्याचे काम मोठया हिरिरीने यशवंतरावांनी केले. ही वैचारिक परंपरा पुन्हा एकदा नव्याने सिध्द करावी लागणार आहे. विकासाच्या क्षेत्राला परिवर्तनाचे तीर्थक्षेत्र मानून महाराष्ट्राच्या शाश्वत विकासासाठी, सर्वांगीण जडणघडणीसाठी, बहुआयामी प्रयत्नांची गरज आहे. ही गरज लक्षात घेवून विकासाचे काम नव्याने सुरु केल्यास आपण विकासाच्या प्रगतीला हातभार लावू शकतो **'अंधार खूप दाटला, पणती जपून ठेवा...'** असा हा एखाद्या पणतीसारख प्रेरणादायी विचार प्रकाश स्फूर्ती देईल, यात संदेह नाही.

**संदर्भ :**


१) सहयाद्रीचे वारे - यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-१९६२

२) युगांतर -कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे-१९७०

३) भूमिका - प्रेस्टीज पब्लिकेशन, पुणे-१९७९

४) शैलीकार यशवंतराव- प्रा.डॉ.शिवाजीराव देशमुख, कौशल्या पब्लिकेशन,सोलापूर एप्रिल २००९.

५) यशवंतराव चव्हाण यांचे समीक्षालेखन व भाषणे- प्रा.डॉ.शिवाजीराव देशमुख, कौशल्या पब्लिकेशन,सोलापूर एप्रिल २००९.